POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२०६ ● मुंबई, बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## विविध समित्यांचे अध्यक्ष कोण आहेत पाहूयात:

- सार्वजनिक उपक्रम समिती: राहुल कुल
- पंचायत राज समिती: संतोष दानवे-पाटील
- अनुसूचित जाती कल्याण समिती: नारायण कुचे
- अनुसूचित जमाती कल्याण समिती: राजेश पाडवी
- महिला हक्क व कल्याण समिती: मोनिका राजळे
- इतर मागासवर्गीय कल्याण समिती: किसन कथोरे
- मराठी भाषा समिती: अतुल भातखळकर
- विशेष हक्क समिती: राम कदम
- धमार्दाय खाजगी रुग्णालय तपास समिती: नमिता मुंदडा
- आश्वासन समिती: रवी राणा
- आमदार निवास व्यवस्था समिती: सचिन कल्याणशेट्टी

# भाजपाची मोठी घोषणा!

## फडणवीसांनी राम कदम, रवी राणांवर सोपवली महत्त्वाची जबाबदारी



### परळी, बारामतीला प्रत्येक ५६४.५८ कोटी रुपये


बीडमधील परळी आणि पुण्यातील बारामतीमध्ये नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. या दोन्ही ठिकाणच्या नव्या महाविद्यालयांसाठी प्रत्येकी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

**■मुंबई। प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधीमंडळ समित्यांची घोषणा आज करण्यात आली. राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत आलेल्या महायुतीमधील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली नवे नियुक्त सदस्य कोण असतील याची यादीच पक्षाकडून जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या यादीमध्ये भाजपाचे घटाकोपरमधील आमदार राम कदम तसेच आपल्या वक्तव्यांमुळे चर्चेत असलेल्या रवी राणा यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोपवल्याचं दिसत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र भाजपाचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजप विधीमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या संमतीनं समित्यांचे नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आल्याचं पक्षाने सांगितलं आहे.

**मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णय**

मंत्रालयामध्ये आज राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयामध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयाने या निर्णयांची माहिती जारी केली आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमध्ये दोन नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांना मंजुरी देण्याबरोबरच एका बँकेसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क कक्षाने मंगळवारी दिनांत २५ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयांचा संक्षिप्त आढावा घेणारी सात निर्णयांची यादी जारी केली आहे. यामध्ये वित्त विभागाने सार्वजनिक उपक्रम, महामंडळांना ठाणे जनता सहकारी बँकेत खाती उघडण्यास परवानगी देण्याच्या महत्त्वाच्या निर्णयाचाही समावेश आहे. याशिवाय पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांसाठी मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे.






# लाडक्या बहिणांना मोठा धक्का, खासदाराने केले धडकी भरणारे विधान

**■मुंबई। प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील महायुती सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेची सध्या सातत्याने चर्चा सुरु आहे. लाडकी बहीण योजनेतंर्गत महिलांना दर महिना १५०० रुपये देण्यात येतात. विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवून २१०० रुपये देऊ असे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. मात्र अद्याप हे पैसे देण्यात आलेले नाहीत. त्याच आता काँग्रेस खासदाराने लाडकी बहीण योजनेबद्दल एक मोठे विधान केले आहे. यामुळे लाडक्या बहिणींना धक्का बसला आहे. काँग्रेस खासदार कल्याण काळे यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना विविध मुद्द्यांवर भाष्य केले. आज सकाळी मी खरपुडीला जाऊन आलो आणि तेथील शेतकऱ्यांची सविस्तरपणे संवाद साधलेला आहे. परंतु तेथील शेतकऱ्यांची कैफियत जाणून घेताना त्या शेतकऱ्यांनी असं सांगितलं की जो भाव इतरांना दिला आहे. तोच दर आम्हाला मिळावा अशी आमची रास्त मागणी आहे. त्यामुळे त्यांच्या मागणीला आम्ही पाठिंबा दिला असल्याचं कल्याण काळे यांनी म्हटले.

**लाडकी बहीण योजनेबद्दल कल्याण काळे काय म्हणाले?**

यानतंर त्यांना लाडकी बहिण योजनेबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर कल्याण काळेंनी प्रतिक्रिया दिली. ''लाडकी बहिण योजना मतं खरेदी करण्यापुरती होते. यामुळे सरकारच्या तिजोरीवर मारलेला डल्ला आणि त्याच तिजोरीवरून आपल्या स्वतःसाठी मतं खरेदी करण्याचं काम या महायुती सरकारने केलं'', असा हल्लाबोल खासदार कल्याण काळे यांनी केला. ''लाडक्या बहिणी योजनेला फक्त गोंडस नाव दिले. त्यामुळे मी तुम्हाला खात्री देतो की ही योजना बंद होणार आहे'', असे विधान कल्याण काळेंनी केले. ''हळूहळू या सरकारचे नाव युती सरकारऐवजी चौकशी सरकार असं नाव ठेवलं, तर योग्य होईल'', असा टोलाही खासदार कल्याण काळे यांनी लगावला.

# आई आणि आजीनेच केली मुलीची हत्या

## कारण ऐकून धक्काच बसेल



**■ठाणे। प्रतिनिधी :** ठाण्यात माणुसकीला काळिमा फासणारी एक घटना घडली आहे. ठाण्यातील नौपाडा येथील गावदेवी परिसरात धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पाठीमागे झोपडपट्टी येथे सख्या आईने आणि आजीनेच आपल्या दिव्यांग मुलीची केली हत्या केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी आजीला अटक केली असून आई फरार आहे. यशस्वी पवार ही जन्मतः दिव्यांग आणि गतिमंद असल्याने तिच्या मरणयातना सहन न होऊन तिच्याच आई आणि आजीने तिला गुंगीच्या गोळ्या देऊन हत्या केली. हत्येचा प्रकार १९ फेब्रुवारी रोजी घडला आहे. या प्रकरणी मुलीच्या मावस आत्याने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर हा सगळा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र, या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. १९ फेब्रुवारी रोजी दोन्ही आरोपी महिलांनी मुलीला झोपेच्या गोळ्या देऊन ठार केले. हत्या केल्यानंतर मुलीला आजी व आई एका चादरीत लपटून घेऊन जातानाचा उउळश समोर आला आहे. तिला एका चार चाकी कारमध्ये टाकून नेल्याची तकार पोलिसांत करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांनी तिच्या आजीला विश्वासात घेत चौकशी केले तेव्हा हा सर्व प्रकार समोर आला आहे. पीडित तरुणी ही जन्मापासूनच आजारी आणि दिव्यांग होती. मुलीला १५ फेब्रुवारीपासून जास्त त्रास होत होता. त्यामुळं तिच्या आईने १९ फेब्रुवारीला तिला झोपेच्या गोळ्या दिल्या. त्यातच तिचा मृत्यू झाल्याने २० फेब्रुवारीला पहाटे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मुळ गावी नेऊन अंत्यसंस्कार केले. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# लग्न जमेना, मराठवाड्यातील ३० वर्षीय युवकाने स्वतःच्याच शेतात संपवलं जीवन



### उच्च शिक्षित मुलांपुढेही तोच प्रश्न

एकीकडे शेतीमालाला भाव नसल्याने व शेती व्यवसाय बेभरवशाचा झाला असून शेतकऱ्याची कुटुंबसंस्थाच उद्ध्वस्त होण्याच्या दिशेने जात असल्याचे वास्तव काही सर्वेक्षणातून पुढे आले आहे. त्यात, मराठवाड्यातील विदभार्तील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था असून शेतीला पाणी नाही, आणि पिकवलेल्या मालाला भाव नाही म्हणून शेतकरी आत्महत्यासारखे टोकाचं पाऊल उचलताना दिसून येतात. विशेष म्हणजे काही मुले पदवीधर, पदव्युत्तर असूनही त्यांच्यापुढे देखील लग्नाची समस्या ठाण मांडून उभी आहे.

**■हिंगोली। प्रतिनिधी :** पुढील काही दिवसांत लगीनसराईची धामधूम पाहायला मिळेल, सर्वत्र लग्नमंडप सजतील आणि नवरदेवांच्या वराती देखील निघल्याचे पाहायला मिळेल. मात्र, लग्न जमत नसल्याने निराशाच्या गर्तेत गेलेली तरुणाई देखील पाहायला मिळत आहे. प्रामुख्याने ग्रामीण महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात शेतर्कयांच्या मुलांच्या लग्नाची समस्या गंभीर बनली आहे. शेतकरी आंदोलन, शेतकरी कर्जमाफी यावर चर्चा सुरू असताना शेतीची दुरवस्था झाल्याने शेतकरी कुटुंबांत किती गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत याचे भयावह वास्तव अनेकदा सर्वेक्षणातून पुढे आले आहे. त्यानुसार, अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या मुलांची लग्न रखडलेली असून वयाची तिशी गाठल्यानंतर देखील केवळ मुली मिळेना म्हणून युवकांची लग्न होत नाहीत. त्यातच, हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील एका ३० वर्षीय युवकाने लग्न जमत नसल्याने आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

लग्नासाठी मुलींच्या अपेक्षा, मुलींच्या पालकांच्या अपेक्षा आणि पुरुष व महिला यांच्यातील जन्मदरात असलेली असमानता यासाठी कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे, आधीच नोकरी नाही, त्यात लग्नासाठी छोकरीपण मिळत नसल्याने तरुणाई निराशेच्या गर्तेत गेल्याचं पाहायला मिळालं आहे. हिंगोलीच्या कळमनुरी शहरातील धक्कादायक घटना समोर आली असून लग्न जमत नसल्याने चक्क युवकाने आपलं जीवन संपवल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. गजानन व्यवहारे असे मृत झालेल्या ३० वर्षीय तरुणाचे नाव आहे. या तरुणाचे लग्न जमत नसल्याने त्याने स्वतःच्या शेतामध्ये झाडाला दोरीने गळफास घेत आत्महत्या केली आहे. याप्रकरणी, कळमनुरी पोलीस ठाण्यामध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत असून मुलांच्या लग्नाची समस्या अधिक गंभीर असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.

# गुजरात मध्ये थैलेसिमिया मुक्त गुजरात उपक्रमाची दमदार सुरुवात

**■मुंबई। प्रतिनिधी :** दिनांक २२.०२.२०२५ रोजी गुजरात येथील वालसाड जिल्ह्यातील उमरगांव तालुक्यातील वलवाडा या गावी श्रीराम मंदीर व श्री हनुमान मंदिर यांच्या वतीने भव्य दिव्य निर्माण प्रसंगी आश्रय ट्रस्टत्त्या वतीने थंलेसिमिया मुक्त गुजरात या महत्वकांशी उपक्रमाची भव्य सुरुवात झाली.

वलवाडा येथे नितीन भाई भानुशाली व त्यांच्या सहकाऱ्यांनी भव्य दिव्य श्रीराम मंदीर व शेजारी श्री हनुमान मंदीर निर्माण केले यावेळी जगतगुरु शंकराचार्य तसेच पन्नास महंताना आंमत्रित करण्यात आले होते. पूर्ण शास्त्रोक्त पध्दतीने राममंदिराची व पुतींर्ची स्थापना करण्यांत आले यावेळी अनेक सरकारी अधिकारी पोलिस यंत्रणा अनेक गावागावांतून आलेल्या भक्तगणांच्यासाठी अनेक कार्यक्रम करण्यांत आले.

यावेळी आश्रय ट्रस्टच्या सास्कृतिक विभाग सचिव डी.आय.ए.एस अधिकारी सौ. स्वाती सूर्वे यांनी नवीन पिढितील मूलांना आय.पि.एस, आय ए एस, एम पी एस सी या परिक्षासंबंधी कार्यशाळा घेतली यामध्ये मुलांनी अभ्यास कसा करावा, केव्हा सुरुवात करावी व जास्तीत जास्त मार्क कशी मिळवावे यासाठी मूलांना मार्गदर्शन केले. तसेच आता भानूशाली व लोहाणा समाजात थैलेसिमिया या रक्तातील आजाराचे खुप मोठे प्रमाण आहे यासाठी आश्रय ट्रस्ट चे पितामह प्रोफेसर प्रकाश पांगम यांनी सर्वांना प्रशिक्षण दिले. या रोगावर उपाय योजना कश्या कराव्या व थैलेसिमिया कसा थांबवता येईल यासाठी महत्वाच्या टिप दिल्या. सदर प्रसंगी भक्तगणांचा उत्साह पाहून राममंदिर कार्यकर्त्यांनी थैलेसिमिया मूक्त गुजरात यासाठी अभियान राबवण्यासाठी आश्रय ट्रस्ट चे संस्थापक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांना विनंती केली लवकरच गुजरात मध्ये भानुशाली व लोहणा समाज यासाठी कार्यक्रम राबवण्यांत येणार आहे.



या उपक्रमाचा उद्देश थैलेसिमिया विषयी जागृती करुन राज्यभर प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवले आहे. यावेळी आश्रय ट्रस्ट त्या संस्थापकीय सचिव सौ. प्रीती दीपक नाईक, उपसचिव, श्री गुरुप्रसाद नाईक, सचिव आरोग्य विभाग प्राध्यापक प्रकाश पांगम, सचिव सांस्कृतिक विभाग सौ. स्वाती सुर्वे मॅडम, सहसचिव सांस्कृतिक विभाग लेफ्टनंट कर्नल संदीप भिसे सर, सौ. पुनम भिसे मॅडम, संस्थापक कार्यकारी सचिव, श्री विनोद मेढे, कार्यकारी सचिव, शिक्षण विभाग श्री श्रेय मांगे (भानुशाली), सांस्कृतिक विभाग कार्यकारी सचिव श्री दिलीप सिंह, एके डायग्नोस्टिक लॅबोरेटरीज ते स्वींद्र कुलकर्णी सर, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन नितीन भाई डाया (भानुशाली), महेश भानुशाली, शंकरभाई भानुशाली, सागर भानुशाली, कृष्णा भाद्रा व प्रकाश भानुशाली, यांनी केले होते. भव्य दिव्य उभारलेल्या पंडालमध्ये लाखो लोकांची जेवणाची उत्तम व्यवस्था सतत एक सप्ताहभर करण्यांत आली होती.











"कोणताही विषयाचो अभ्यास नियोजन करुन व एकाग्रतो ठेवली तर पास होण्यास सोपा मार्ग आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचे पुढील भविष्य साकारण्यासाठी थोडे जास्त श्रम घ्यावे झ्र आय ए एस ऑफिसर सौ. स्वाती सूर्वे भानुशाली समाज व लोहाणा समाज यामध्ये मोठ्या प्रमाणात असणाऱ्या थंलेसिमिया यासाठी आश्रय ट्रस्ट च्या वतीने तो रोकण्यासाठी उपाययोजना करुन कायम सरकार्य करु."

**- प्रोफेसर प्रकाश पांगम**











## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मराठीच्या भवितव्याचा गुंता!

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नवी दिल्ली येथे पार पडले. या संमेलनाचे उद्घाटक असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचे भाग्य आपल्याला लाभले याबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांनी मराठी भाषा आणि महाराष्ट्राविषयी अतिशय चांगले विचार आपल्या भाषणातून मांडले. या संमेलनाच्या निमित्ताने काही गोष्टी पुढे आल्या. संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या भाषणातून अतिशय चांगले विचार मांडले. खरंतर प्रत्येक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या भाषणातील विचार हे चांगलेच असतात. काही संमेलनाध्यक्ष आपल्या भाषणाला कुठल्या तरी सत्ताधाऱ्यावर ताशेरे ओढून त्याला वादाची फोडणी देतात. या फोडणीमुळे साहित्य संमेलनातील साहित्यिक चर्चेपेक्षा त्या वादग्रस्त विधानाची चर्चा जास्त होत राहते. त्यामुळे बरेचदा साहित्य संमेलनाचा जो मूळ हेतू असतो तो बाजूला राहतो. साहित्यिक आणि लोक त्या वादाभोवती घुटमळत राहतात. त्यामुळे साहित्य संमेलनाचे व्यासपीठ हे मराठी भाषा आणि तिला पोषक वातावरण कसे निर्माण होईल यासाठी आहे की तीन दिवसांत काही वादग्रस्त विधाने करून आपल्याभोवती सगळ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आहे, असा प्रश्न पडतो. कारण साहित्य संमेलन झाल्यावर पुढील साहित्य संमेलनापर्यंत या संमेलनाचे अध्यक्ष वर्षभर काय करीत असतात याचे सामान्य माणसाला कुतूहल असते. मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून सगळेच अध्यक्ष मराठी भाषेच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त करतात, पण आजघडीला विचार केला तर किती मराठी साहित्यिकांची मुले आणि नातवंडे मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये जातात याचे सर्वेक्षण करावे. तसे केल्यास मोठा अपेक्षाभंग होईल. काही सन्माननीय अपवाद सोडले तर ही मंडळी आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये का घालतात, मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये का पाठवत नाहीत, याचे ही साहित्यिक मंडळी उत्तरे देऊ शकतील का? सध्या आपली मुली इंग्रजी माध्यमात शिकतात हा सगळ्यांसाठी एक प्रतिष्ठेचा मुद्दा बनलेला आहे. इंग्रजी माध्यमात शिकलेल्या बहुसंख्य मराठी मुलांसाठी मराठी भाषा ही आता बोलण्यापुरती मर्यादित राहिलेली आहे. त्यांना मराठी व्यवस्थित वाचता आणि लिहिता येत नाही. मराठीतील साहित्यिक, कवी आणि त्यांचे साहित्य यांची माहिती असण्याचा तर प्रश्नच नाही. याचा अर्थ मराठी लोकांनी इंग्रजीचा बहिष्कार करावा असा नाही, पण ज्यासाठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते, काही कोटी रुपये त्यावर खर्च केले जातात, त्याचा उद्देश सफल होत आहे की केवळ संमेलनाध्यक्षांच्या सुरुवातीच्या आणि समारोपाच्या भाषणाइतकेच त्याचे महत्त्व राहणार आहे. भाषा का दुर्लक्षित होते, तिचा प्रभाव का कमी होत जातो, हळूहळू लोक अन्य भाषेचा अवलंब का करतात, हा खरंतर समाजशास्त्रीय संशोधनाचा विषय आहे. संस्कृत ही केवळ एका राज्यातील नव्हे तर भारतीय उपखंडातील ज्ञानभाषा होती. असे असताना तिचा प्रभाव का कमी होत गेला याचा विचार करावा लागेल. मराठी भाषा आज अनेक मराठी लोकांना नकोशी का वाटत आहे, अनेक लोक आर्थिक ऐपत नसताना उधारउसणवारी करून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये का घालत आहेत, त्यांच्या शिकवण्यांवर का खर्च करीत आहेत, त्यांना इंग्रजी शिकल्यावर आपल्या मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल असा विश्वास का वाटतो, तो विश्वास देण्यात मराठी भाषा कुठे कमी पडत आहे, आपण इंग्रजी माध्यमात न शिकल्यामुळे पुढील आयुष्यात आपल्याला ज्या अचडणी आल्या त्या आपल्या मुलांना भेडसावू नयेत असे मराठी लोकांना का वाटते, त्यामुळे मराठी शिकताना ही कमरतता कशी भरून काढता येईल याचा विचार व्हायला हवा. आपल्या मराठी समाजातील बहुजन वर्ग हा अभिजनांचे अनुकरण करीत असतो. अभिजन वर्गाने जेव्हा काळाची पावले ओळखून आपल्या मुलांना युरोप अमेरिकेमध्ये जाण्यासाठी आणि जागतिक नागरिक होण्यासाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालायला सुरुवात केली, तेव्हा बहुजन समाजाने त्यांचे अनुकरण करायला सुरुवात केली. आपल्याला अभिजनांच्या पंगतीला जाऊन बसायचे असेल, त्यांच्यासारखी प्रगती करायची असेल, त्यांच्या मुलांप्रमाणे आपल्या मुलांना युरोप-अमेरिकेत पाठवायचे असेल तर त्याला इंग्रजी माध्यमाशिवाय पर्याय नाही, असे त्याला वाटू लागले. त्यामुळे ते आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालू लागले. इंग्रजी माध्यमात शिकणे हे आज प्रगतपणाचे लक्षण मानले जात आहे. ही स्थिती फक्त शहरांमध्येच नाही, तर गावोगावी इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळा सुरू झाल्या आहेत. मराठी शाळा पटसंख्येअभावी बंद पडत आहेत. ही अवस्था केवळ मराठी भाषेची आहे असे नाही, तर अन्य राज्यांमध्येही त्यांच्या राज्याच्या भाषेची थोड्याबहुत फरकाने अशीच परिस्थिती आहे. भाषेचे प्रेम कुणाला नसते, पण जेव्हा ती भाषा आपल्या भौतिक प्रगतीला पोषक ठरते तेव्हाच ते प्रेम टिकून राहते हे कटू वास्तव आहे. कारण भौतिक प्रगती झाली नाही तर संस्कृती टिकवणेही कठीण असते.

# अनधिकृत इमारती बांधल्या जाण्यापासून रोखण्यासाठी एवढे तरी कराच...

**अनधिकृत इमारतींमुळे सामान्य नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी सरकारने काही प्रतिबंधात्मक उपाय तातडीने योजणे गरजचे आहे...**



कल्याण - डोंबिवलीतील ५८ बेकायदा इमारतींमधील सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकार गरज भासल्यास सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच केली आहे. उच्च न्यायालयाने पुराव्यांच्या आधारेच या इमारतींची अनधिकृतता तपासून निर्णय दिलेला असल्याने मुख्यमंत्री या निकालास निष्प्रभ ठरवणारा प्रशासकीय निर्णय करू शकणार नाहीत. बनावट कागदपत्रांच्या आधारे कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या व 'महारेरा'चा नोंदणी क्रमांक मिळविलेल्या ६५ इमारती पाडून टाकण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. यापैकी सहा इमारती आधीच पाडून टाकण्यात आल्या आहेत. एक इमारत उभारण्यात आलेली नाही. राज्य सरकारकडून बेकायदा अनधिकृत इमारतींना अभय देण्याचा प्रयत्न केला गेल्यास उच्च न्यायालय राज्य सरकारला हि आठवण करून देऊ शकते की, मुळात राज्य सरकारचे सांविधानिक उत्तरदायित्व हे अनधिकृत इमारतींना आळा घालण्याचे आहे, अभय देण्याचे नाही. मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया ही वर्तमानातील शासन प्रशासनाच्या 'घटना घडून गेल्यानंतर प्रतिक्रियात्मक हालचाली' या वर्गात बसणारी आहे. राज्य सरकारने केवळ या ५८ (खरे तर ६५) इमारतींचे प्रकरण इतक्याच लघुदृष्टीने न पाहता 'राज्यातील अनधिकृत बेकायदा इमारती प्रकरणे आणि त्याचा नागरिकांच्या आर्थिक-सामाजिक परिणाम' अशा व्यापक दृष्टिकोणातून पाहून अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याची गरज आहे. याबाबतीत 'महारेरा' सारखी यंत्रणाही पुरेशी ठरत नसल्याचा अनुभव याच इमारतींच्या प्रकरणात आलेला असल्याने ही गरज वाढलीच आहे.

बेकायदा, अनधिकृत बांधकामे उभारून आणि त्यातील सदनिका विकून सामान्य नागरिकांची फसवणूक करण्याचे प्रकार वारंवार उघड होत असतात. खेदाची बाब ही आहे की असे प्रकरण पुढे आल्यावर न्यायालये सदरील इमारती निष्कासित करण्याचे आदेश देतात, काही इमारती पाडल्याही जातात; परंतु बेकायदा अनधिकृत इमारती उभ्या राहण्यास जबाबदार असणारे लोक-स्थानिक स्वराज्य संस्थातील अधिकारी, बेकायदा बांधकामास अर्थपूर्ण पद्धतीने वरदहस्त देणारे सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी- हे मात्र मोठा आर्थिक लाभ घेऊन नामानिराळे राहताना दिसतात. हा प्रकार म्हणजे दोषी मुक्त आणि निरपराध नागरिक उद्ध्वस्त असा ठरतो. आता पुरे! गरज आहे ती अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी, डोंबिवलीतील ६५ अनधिकृत इमारतीच्या प्रकरणातून सरकारने योग्य धडा घेऊन भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी तातडीने उपाय योजणे निकडीचे वाटते.

**यासाठी दृष्टिक्षेपातील उपाय असे :**

(१) राज्य सरकारने नोंदणी व निबंधक कार्यालयांना रजिस्ट्रेशनसाठी आलेल्या कागदपत्रांची वैधता तपासण्याचा अधिकार नाकारणारा कायदा बरखास्त करून २१ व्या शतकाला साजेसा असा नोंदणीसाठी येणारे प्रत्येक कागदपत्र ह्यअधिकृत इमारतीतील सदनिकेसाठीह्ण असल्याची पडताळणी करण्याचा अधिकार असणारा कायदा तातडीने निर्माण करावा.

(२) प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला तिने दिलेल्या सीसी, ओसी यांची- म्हणजेच पयार्याने, तिने अधिकृत ठरवलेल्या इमारतींची यादी संकेतस्थळावर टाकणे अनिवार्य करावे.

(३) सदनिका नोंदणीच्या दस्तऐवजचे रजिस्ट्रेशन करण्यापूर्वी नोंदणी व निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांना सदरील सदनिका ज्या इमारतीत आहे ती अधिकृत आहे किंवा नाही याची पडताळणी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संकेतस्थळावर जाऊन पडताळणी करणेदेखील अनिवार्य करावे.

(४) अधिकृततेबाबत पडताळणी करूनच सदनिकांचे रजिस्ट्रेशन करण्याचा नियम अंमलात आणल्यास सदरील सदनिका विकल्या जाणार नाहीत व पयार्याने बेकायदा बांधकामे करण्यास विकासक धजावणार नाहीत.

(५) महाराष्ट्र राज्यातील सर्व इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारावर सदरील इमारतीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवश्यक परवानग्या, महारेरा नोंदणी याची परिपूर्ण माहिती देणारे फलक व क्यूअर कोड लावणे सक्तीचे करावे.

(६) कुठलेही अनधिकृत, बेकायदा इमारतीचे बांधकाम हे प्रशासनाच्या अर्थपूर्ण वरदहस्ताशिवाय होणे कदापिही शक्य नाही हे नग्न सत्य लक्षात घेत सरकारने भविष्यात बेकायदा, अनधिकृत बेकायदा बांधकामासाठी संलग्न प्रशासनाला उत्तरदायी धरण्याचा नियम करावा.

(७) सदनिकांना कर्ज देण्यापूर्वी सदरील सदनिकेच्या इमारतींची वैधता तपासणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना अनिवार्य करावे .

(८) राज्य मानवी हक्क आयोगाने व्यक्ती मेल्यानंतरच त्याच्या जिवाची किंमत न करता, अनधिकृत इमारतींच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या रस्त्यावर येण्याचा प्रकार हादेखील व्यक्तीला मरणाइतक्याच वेदना देणारा ठरतो, हे ध्यानात घेऊन भविष्यात व्यवस्थेतील कालबाह्य कायद्यांमुळे किंवा प्रशासकीय सदोष पद्धतीमुळे सामान्य नागरिकांची बेकायदा इमारतींमुळे होणारी आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी सरकारला उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत.

यापैकी काही बंधने आजही कायद्याने घातलेली आहेत. उदाहरणार्थ, महारेरा नोंदणी क्रमांक आदींची माहिती देणारा फलक लावणे. पण त्यांचे पालन मात्र केले जातेच असे नाही. ते काटेकोरपणे व्हावे, अशी अपेक्षा या सूचना करण्यामागे आहे. महत्त्वाचे म्हणजे, सरकारने बेकायदा अनधिकृत इमारतींबाबतीत वर्षानुवर्षे घेतलेल्या 'गांधारी धृतराष्ट्र दृष्टिकोना'ला तिलांजली द्यावी, अशी अपेक्षा आहे. आपल्या आयुष्याची पुंजी पणाला लावून घर घेणाऱ्या सामान्य नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी एवढे करावेच लागेल.

# उपग्रह तंत्रज्ञान आणि एआय




गेल्याच महिन्यात डीपसीक आर-१ या चिनी चॅटबॉटने जगातील महासत्तांमध्ये खळबळ उडवून दिली. चिनी स्टार्टअपने तंत्रज्ञानात घेतलेल्या या आघाडीचे पडसाद जगभरात, विशेषतः अमेरिकेच्या शेअर बाजारावर उमटले आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील जागतिक महासत्तांमधील वर्चस्वाची शर्यत उघड झाली. ओपनएआय आणि त्याच्या चॅट-जीपीटी टूलचा स्पर्धक असलेला डीपसीक कमी स्त्रोतांमध्ये समान कामगिरी करत असल्याचे दिसून आल्याने अमेरिकेच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या झेपेला धक्का बसला आहे. जागतिक महासतांसाठी हा 'स्पुटनिक क्षण' म्हटला गेला आहे. १९५७ साली सोव्हिएत युनियनने (आताचा रशिया) स्पुटनिक उपग्रह अवकाशात पाठवला, तेव्हा जगातील शस्त्रास्त्रांची शर्यत तीव्र झाली आणि शीतयुद्धातील तणाव वाढला. सध्याच्या बहुध्रुवीय जागतिक भूराजनीतीमध्ये, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह तंत्रज्ञान यांचा मेळ साधून जागतिक महासत्ता जगावर वर्चस्व राखण्याच्या प्रयत्नांत आहेत. जागतिक महासत्तांचे संरक्षण विभाग रिअल टाइम धोक्याचा शोध घेण्यासाठी, धोक्यांचा प्रतिसाद वेळ कमी करण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेत सुधारणा करण्यासाठी एआयने युक्त उपग्रह तैनात करण्याच्या प्रयत्नात आहेत. नजीकच्या भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे उपग्रह तंत्रज्ञानाशी एकत्रीकरण संरक्षण क्षेत्राला आकार देईल. टेहळणी, संदेशवहन आणि स्वायत्त लष्करी ऑपरेशन्स यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेने युक्त उपग्रह महत्त्वाची भूमिका बजावतील. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह तंत्रज्ञान जगभरातील अर्थव्यवस्था आणि उद्योगांमध्ये परिवर्तन घडवत आहे. अशा वेळी भारताला भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी अतुलनीय संधी आहे. २०१९ मध्ये, संरक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या उच्चस्तरीय 'संरक्षण एआय परिषदे'कडे संरक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी धोरणात्मक दिशा देण्याचे काम सोपवले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह तंत्रज्ञानातील या घडामोडी भविष्यात जागतिक वर्चस्व स्पर्धेचीं आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरवतील.

# दिल्लीची लक्ष्मणरेषा

दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांचा कारभार कसा असेल हा प्रश्न कुणालाही पडलेला नसेल. कारण तो विचारला गेलाच, तरी त्याचे उत्तर चटकन देता येते- पक्षातील वरिष्ठांचे समाधान करणारा असाच कारभार त्या करू पाहातील, हे स्पष्ट आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल भाजपला स्पष्ट बहुमत देणारा असूनही मुख्यमंत्री निवडीसाठी तब्बल २० दिवसांची प्रतीक्षा करावी लागली, यातूनच सर्व इच्छुकांना डावलून नव्या चेहऱ्यास संधी दिली जाणार याचे संकेत मिळत होते. रेखा गुप्ता यांना गेल्या दहा वर्षांत दिल्ली विधानसभेने हुलकावणीच दिली. नगरसेवक पदावर त्यांना समाधान मानावे लागले. मात्र भाजपचे शीर्षस्थ नेते मुख्यमंत्रीपदी वर्णी लावताना अनुभव हा निकष मानत नाहीत, हे गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांतही दिसलेले आहेच. गुप्ता यांच्या निवडीसाठी तीन मुद्दे महत्त्वाचे ठरले. एकतर रा. स्व. संघाशी जवळीक. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमार्फत दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी संघाची निवडणूक जिंकणाऱ्या गुप्ता या त्याहीआधी राष्ट्र सेविका समितीचेही काम करीत, असे आता सांगितले जाते. त्यांच्या निवडीमागे संघाचा हातभार असणार, हे उघड आहेच. पण भाजपला मतपेढीच्या बळकटीकरणासाठी त्या महिला असणे आणि वैश्य समाजातल्या असणे हेही महत्त्वाचे वाटणे साहजिक. 'आप'ने अरविंद केजरीवाल यांच्याऐवजी मुख्यमंत्री निवडण्याची वेळ आली तेव्हा अतिशी यांना संधी दिली होती आणि केजरीवाल, मनीष सिसोदिया आदी आप-नेत्यांना पराभव पत्करावा लागला असूनही अतिशी विधानसभेत असतील. एवढेच कारण भाजपने महिलेला संधी देण्यामागे नाही. ओबीसींसारखे समाजघटक हाताशी आल्यानंतर आता महिला या मतपेढीकडे लक्ष पुरवण्याचे भाजपने जाणीवपूर्वक ठरवलेले दिसते. त्यासाठी 'लाडकी बहीण'सारख्या थेट पैसेवाटपाच्या योजना उपयोगी पडणार आहेत, पण महिला नेतृत्व म्हणून नवे चेहरे समोर आणत राहणेही गरजेचे आहे. निर्मला सीतारामन, स्मृती इराणी यांच्यानंतरचा चेहरा म्हणून रेखा गुप्ता यांच्याकडे पाहिले जाईल. इथेही हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली या राज्यांतील भाजपच्या मुख्यमंत्र्यांमध्ये एक साम्य दिसेल- हे सारे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याप्रमाणेच संघाला मानणारे आणि वयामुळे पुढली किमान दोन दशके नेतृत्वाची संधी मिळू शकेल, असे आहेत. पण खास दिल्लीच्या राजकारणाचा विचार भाजपच्या शीर्षस्थांनी केला असेल, तर मुख्यमंत्रीपदावरील व्यक्ती आपल्या शब्दाबाहेर नको- स्वतःची राजकीय ताकद उभारू शकणारी नको, असे नकारात्मक मुद्देही मोजले गेले असल्यास नवल नाही. केजरीवालांचा पराभव करून भाजपच्या दिल्ली-विजयाचे नायक ठरलेले आणि वडील साहिबसिंह वर्मा यांच्याप्रमाणेच मुख्यमंत्रीपद भूषवण्याची आशा बाळगणारे प्रवेश वर्मा यांचे घोडे अडले ते नेमके या नकारात्मक मुद्द्यांमुळे. एकतर प्रवेश वर्मा हे जाट. तो समाज दिल्लीपुरता भाजपकडेच असला तरी, दिल्लीतील जाट ताकदीचा लाभ एकट्या वर्मांना मिळू देणे हे शीर्षस्थांच्या दृष्टीने बिनकामाचे. त्यामुळे मग वैश्य समाजातल्या रेखा गुप्तांचे नाव आणखी पुढे आले, त्यांचे घराणे मूळचे हरियाणाचेच वगैरे तपशिलांची त्यास जोड मिळाली. वास्तविक एखाद्या विशिष्ट समाजगटाला नेतृत्व देऊनच मने जिंकावी लागणार, अशी अगतिकता भाजपला अजिबात नाही- ती कैक राज्यांत नाही. उलटपक्षी, कोणत्या समाजगटाच्या राजकीय आकांक्षा 'आटोक्यात' ठेवायच्या, याचा विचार आता शीर्षस्थ करतील, अशी सद्याःस्थिती. त्यामुळे वर्मांनीच गुप्ता यांचे नाव सुचवावे आणि मंत्रीपदावर समाधान मानावे, असे ठरले आणि झालेदेखील. गुप्ता यांच्या आडून दिल्लीच्या नाड्या स्वतःकडेच ठेवण्याचा प्रयत्न केंद्रीय नेतृत्व करणार, हे उघड असले तरी 'आप'चा जनाधार कमकुवत करत राहण्यासाठी दिल्लीत पुढल्या तीन महिन्यांत- १०० दिवसांत- 'करून दाखवले'ची हवा तयार करावीच लागेल. निवडणुकीनंतर यमुना स्वच्छ करण्यात दिल्लीच्या नायब राज्यपालांनी आधीच पुढाकार घेतला असला, तरी त्या कामापेक्षा महिलांच्या खात्यांत २५०० रुपयांचा भरणार करणे, त्याची 'लाडकी बहीण' इतकीच प्रसिद्धी करणे याला प्राधान्य मिळणे साहजिक. 'आप'ची कोणतीही योजना बंद करणार नाही, अशा अर्थाचे आश्वासन भाजपच्या जाहीरनाम्यात होतेच, ते पाळताना आम्ही 'आप'पेक्षा चांगला कारभार करतो, असेही दाखवावे लागेल. त्याकामी नायब राज्यपालांची साथ मिळत राहीलच, पण मुख्यमंत्री म्हणून गुप्ता यांनाही नायब राज्यपाल तसेच शीर्षस्थ नेते यांच्याशी सहकार्याचे पूल सतत खुले ठेवावे लागतील. 'डबल इंजिन' सरकारचे फायदे दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांस मिळाले तरी नायब राज्यपाल आणि केंद्रीय नेते यांनाही कारभारात लक्ष घालण्याची इच्छा असतेच, हे शीला दीक्षित यांच्या कार्यकाळातही दिसले होते. तेवढे सांभाळले, तर भाजपच्या दिल्लीवासी नेतृत्वाचा चेहरा म्हणून गुप्ता पुढे येऊ शकतात आणि पाचच काय, दहा वर्षेही पदावर राहू शकतात. दिल्लीचे मुख्यमंत्रीपद काही लक्ष्मणरेषांच्या आतच सांभाळायचे असते, एवढे ओळखता आले की झाले!

# विविध सरकारी योजनांचे खरे लाभार्थी कोण?

**लोकसभा असो की विधानसभा निवडणुका, राजकीय पक्षांकडून विविध घोषणांचा पाऊस पाडला जातो. त्यात ह्यमोफतह्ण योजनांचे गाजर तर हमखास परिणाम देणारे. कारण, सर्वसामान्यांची हीच कमकुवत बाजू केवळ व्यावसायिकांनीच नव्हे तर, राजकारण्यांनीसुद्धा ओळखली आहे. कोणतीही पूर्वआखणी न करता बेधडक आश्वासन दिले जाते. पूर्वी, काही वर्षे तरी अशा योजना चालायच्या, पण आता काही महिनेच चालतात. मधला तीन-चार वर्षांचा काळ जातो. लोकांची ह्यशॉर्ट मेमरीह्ण कामाला येते. नव्याने घोषणांचे पीक निघते!**




प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असते, असे म्हणतात. राजकारणातही तेच असते. कारण राजकारण्यांना खुर्चीवर प्रेम असते, त्यामुळे मतदारराजांच्या भावनांचा कसाही खेळ ते मांडू शकतात. त्यांना ते क्षम्य असते. बेगडी आरोप-प्रत्यारोप आणि आश्वासनांचा पूल उभा करतात आणि ते सत्तेपर्यंत ते पोहोचतात. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील जनतेने त्याचा अनुभव घेतला आहे. पण समस्या हीच आहे की, सर्वसामान्यांनी सारासार विचार न करणे आणि शॉर्ट मेमरी यामुळे त्याचा फारसा फरक राजकारण्यांना पडत नाही. लोकसभा निवडणुकीत सुरुवातीला 'अब की बार चारसौ पार'चा फाजील आत्मविश्वास तसेच धमार्चे राजकारण याचा फटका भारतीय जनता पार्टीला बसला. त्याउलट, सत्तेत आल्यावर भाजप राज्यघटना बदलणार, या दिशाभूल करणाऱ्या प्रचाराचा फायदा विरोधकांना झाला. इथेही सद्सद्विवेकबुद्धी कायम ठेवून जातीधर्माच्या राजकारणाला न भूलणारा मतदार राज्यघटना बदलण्याच्या गैरप्रचाराला फशी पडला. त्यामुळे त्या निवडणुकीत महाराष्ट्रात तरी, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या महायुतीची पीछेहाट झाली. तर, महाविकास आघाडीची सरशी झाली.

राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने लोकप्रिय घोषणांचा पाऊस पाडला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण, मुख्यमंत्री तीर्थदर्शन, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा अनेक योजना जाहीर केल्या, त्याची 'दिल खोल के' अंमलबजावणी केली. त्यानंतर निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाल्यावर या योजना बंद न करण्याची ग्वाही देऊन महायुती थांबली नाही तर, या रकमेत वाढ करण्याचे आश्वासनही दिले. त्याचा अनुकूल परिणाम राज्य विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळाला. महायुतीला घवघवीत यश मिळाले आणि विरोधकांच्या महाविकास आघाडीला दारुण पराभव स्वीकारावा लागला. पण एवढे करूनही पुढे काय?

विधानसभा निवडणुकीत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' गेमचेंजर ठरली. खुद्द महायुतीच्या नेत्यांना त्याची खात्री होती आणि तसा दावाही त्यांनी केला होता. पुन्हा सत्तेवर आल्यानंतर लाडकी बहीण योजना बंद करणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच अजित पवार यांनी दिली. पण प्रत्यक्षात या योजनेचे निकष काटेकोर करत, लाडक्या बहिणींची संख्या दर महिन्याला कमी करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, २ कोटी ३ लाख लाभार्थी असलेल्या लाडक्या बहिणींची संख्या अडीच कोटींवर नेण्याचा मानस खुद्द विद्यमान उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी बोलून दाखवला होता. पण त्यांनीच वाढता आर्थिक भार लक्षात घेऊन खर्चकपातीचे धोरण अवलंबले आहे. त्यामुळे या सर्व लोकप्रिय घोषणांचे निकषही कठोर करण्यास सुरुवात केली आहे. २३ नोव्हेंबर २०२४ ला विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला आणि आता त्याला तीन महिने झाले आहेत. या तीन महिन्यात या योजनेच्या तब्बल ९ लाख लाभार्थी महिलांना वगळण्यात आले आहे. प्रश्न हा आहे की, निवडणुकीच्या आधी निकष लक्षात आले नाहीत का? की निवडणूक जिंकण्यासाठी मदतीचे वाटप करण्यात आले? मग निकष निधीच्या वाटपासाठीच लागू होतात का? साधे उदाहरण आहे रेशनिंगचे! हातात केशरी शिधापत्रिका घेऊन दुचाकीवरून लोक रेशन घेण्यासाठी येतात, हे कोणत्या निकषात बसते? म्हणजेच, जिथे गोलमाल करता येतो तिथे निकष गुंडाळून ठेवले जातात आणि नुसताच खर्च करावा लागतो तिथे निकष कठोर केले जातात, असाच याचा अर्थ आहे.

आता एसटीच्या योजनांबाबतही तसेच संकेत मिळत आहेत. महिलांना प्रवासभाड्यात ५० टक्क्यांची सवलत तर, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास यासह विविध योजनांमुळे एसटी महामंडळाला दररोज सुमारे तीन कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत असल्याचे खुद्द परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले आहे. त्यांच्याच पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजना बंद होणार नाहीत, अशी ग्वाही दिली. लाडकी बहीण योजनेच्या बाबतीतही सरकारने ग्वाही दिली होती, पण निकष कडक करून ज्याप्रमाणे या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या घटवली जात आहे, तसा प्रकार एसटीबाबतही होऊ शकतो आणि त्याचीच दाट शक्यता आहे. कारण, आर्थिक चणचण लक्षात घेता त्याचीच शक्यता दाट आहे. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनाही त्याच मार्गावर आहे.

गरीबांच्या नावाखाली सुरू केलेल्या शिवभोजन आणि आनंदाचा शिधा या दोन योजनाही बंद केल्या जाण्याची चर्चा आहे. शिवभोजन योजनेअंतर्गत गरीब आणि गरजूंना १० रुपयांच्या अनुदानित दराने लाभार्थ्यांना एक सकस जेवण दिले जाते, ज्यामध्ये दोन पोळ्या, एक वाटी भाजी, एक वाटी डाळ आणि एक वाटी भात असतो. तर, २०२२ मध्ये केशरी रेशनकार्ड असलेल्या कुटुंबांना १०० रुपये या सवलतीच्या दरात 'आनंदाचा शिधा' हा किट देण्यास सुरुवात झाली. या किटमध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ आणि साखर, तसेच एक लिटर तेल समाविष्ट होते. या योजना आता बंद होतील आणि काहीकाळ चर्चा सुरू राहून तीसुद्धा बंद होईल.

जवळपास ३० वर्षांपूर्वीच्या युती सरकारने गरीबांसाठी सुरू केलेली एक रुपयात झुणका भाकर योजना किती जणांच्या लक्षात आहे. १ मे १९९५ रोजी या एक रुपयात झुणका भाकर योजनेची सुरुवात करण्यात आली होती. सर्वसामान्यांच्या मुखी अन्न आणि बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी तत्कालीन शिवसेना-भाजप युती सरकारने ही योजना लागू केली होती. राज्यभरात ६ हजार ३११ केंद्रांचे वाटप करण्यात आले. त्या योजनेअंतर्गत मुंबई शहरातील मोक्याच्या जागा या झुणका भाकर केंद्र चालकांनी मिळविल्या. कालांतराने ती केंद्रे दुसऱ्यांना चालवण्यास देण्यात आली. मोक्याची जागा मिळवणाऱ्यांना त्याचा बराच फायदा झाला. अवघ्या पाच वर्षांत म्हणजे जून २००० मध्ये राज्यात सत्ताबदल झाल्यावर ही योजना गुंडाळण्यात आली. काही ठिकाणी निर्धारित एक रुपयापेक्षा जास्त दराने विक्री केली जात होती. तर, काही ठिकाणी ही केंद्रे भाड्याने देण्यात आली होती. तर, काही केंद्रांवर झुणका भाकरऐवजी दुसऱ्या वस्तूंची विक्री केली जात असल्याच्या असंख्य तक्रारी होत्या. म्हणून आधी या योजनेची सबसिडी बंद केली आणि नंतर ही योजनाच!

या मोफत योजना लोकांच्या दृष्टीने, समाजाच्या दृष्टीने हानिकारक आहेत. याची जाणीव खुद्द सर्वोच्च न्यायालयाने करून दिली आहे. लोकांना मोफत रेशन मिळते, कोणतेही काम न करता पैसे मिळतात. त्यांच्या अडचणी समजल्या जाऊ शकतात. पण यामुळे ते काम करण्यास सहज तयार होत नाहीत. त्यांनीही मुख्य प्रवाहात सहभागी होऊन देशाच्या विकासाला हातभार लावला पाहिजे, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली. याचा सर्वांनीच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सुपर मार्केट किंवा एखाद्या मॉलमध्ये गेल्यावर सर्वसामान्य अशाच ऑफरना भुलतो. एकावर दुसरी वस्तू फ्री मिळत असल्याने त्याची खरेदी केली जाते. ती खरोखरच आपल्या गरजेची आहे का? असल्यास एकाचवेळी दोन घेण्याची गरज आहे का? याचा विचार केला गेला पाहिजे.

सर्वसामान्य जनता अशा मोफतच्या ऑफरना सहज भुलते हे या व्यापाऱ्यांप्रमाणेच राजकारण्यांच्या चांगलेच लक्षात आले आहे. त्यामुळे व्यापारी नफ्याचे तर राजकारणी सत्तेचे गणित मांडून सर्वसामान्यांना त्यात अडकवतात. त्याच्यापासून सावध राहिले पाहिजे. कारण अशा योजनांचे खरे लाभार्थी तुम्ही-आम्ही सर्वसामान्य नसतातच, राजकारणीच खरे लाभार्थी असतात. एखादी मोफतची योजना जाहीर होते आणि ती गेमचेंजर ठरणार आणि आपल्याला सत्ता मिळणार, याची खात्री त्यांना असते. सत्तेचा लाभ त्यांना किमान पाच वर्षे मिळतो. सर्वसामान्यांसाठी जाहीर केलेल्या या योजना, आजकाल पाच महिनेही चालत नाहीत! ही मेख सर्वसामान्यांनी समजून घेतली पाहिजे.

# महाशिवरात्रीचे व्रत का करावे?

माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथी महाशिवरात्र म्हणून पाळली जाते. या दिवशी उपवासाचे व्रत करतात. भगवान शिवाची आराधना आणि प्रार्थना करून दुर्सया दिवशी व्रताची सांगता केली जाते. महाशिवरात्री माघ वद्य त्रयोदशीला महाशिवरात्री म्हणतात. महाशिवरात्रीचे व्रत हे काम्य व नैमित्तिक कात आहे.

**महाशिवरात्रीचे व्रत का करावे :** शिवाच्या विश्रांतीच्या काळात शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या काळात शिव ध्यानावस्थेतून समाधी-अवस्थेत जातो. शिवाची समाधी-अवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ. त्या काळात विश्वातील तमोगुण शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे विश्वामध्ये तमोगुणाचे प्रमाण किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून शिवतत्त्व आकृष्ट करून घेण्यासाठी महाशिवरात्रीचे कात करावे.

**व्रत आचरण्याची पद्धत व विधी :** उपवास, पूजा व जागरण ही या काताची तीन अंगे आहेत. शिवरात्रीच्या दिवशी एकभुक्त राहावे. शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना ''यामपूजा'' असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालून अनुलेपन करावे. शिवतत्त्व आकृष्ट करणारा बेल, पांढरी फुले व रुद्राक्षांच्या माळा शाळुंका व शिवपिंडीवर वाहाव्यात. धोत्रा व आंबा यांची पत्रीही या पूजेत वाहतात. तांदुळाच्या पिठाचे 26 दिवे करून त्यांनी शिवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेचे मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. शिवस्मरणात जागरण करावे. पहाटे स्नान करून पुन्हा पूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. ब्राह्मणांचा आशीर्वाद घेऊन कातसमाप्ती करावी.

**महाशिवरात्रीला शिवाचा नामजप करण्याचे महत्त्व :** महाशिवरात्रीला विश्वात वाढणाऱ्या तमोगुणापासून रक्षण होण्याकरता शिवतत्त्व आकृष्ट करण्यासाठी शिवाचा ''ॐ नमः शिवाय'' हा नामजप जास्तीतजास्त करावा.

**शिवपूजेची वैशिष्ट्ये :**

- शिवपिंडीला थंड पाणी, दूध किंवा पंचामृत यांनी स्नान घालतात.
- शिवाच्या पूजेत हळद-कुंकू वापरत नाहीत; मात्र भस्म वापरतात.
- शिवपूजेत पांढऱ्या अक्षता वापरतात.
- शिवाक्षाला तांदूळ, क्वचित गहू व पांढरी फुले वाहतात.
- शिवपिंडीला पूर्ण प्रदक्षिणा न घालता अर्धचंद्राकृती प्रदक्षिणा घालतात.

# महाशिवरात्री कधी आहे?
## जाणून घ्या तारीख, पूजा, विधी अन् शुभ मुहूर्त

हिंदू धर्मात महाशिवरात्रीला अनन्यसाधारण महत्व आहे. महाशिवरात्रीचा दिवस भगवान महादेवाच्या भक्तांसाठी महत्वाचा असतो. या दिवशी भगवान महादेव आणि माता पार्वतीची पूजा केल्यास वैवाहिक जीवनात सुख-समृद्धी येते असे मानले जाते. या दिवशी रुद्राभिषेक करुन महामृत्युंजय मंत्राचा जप करुन शिवलिंगावर जल आणि बेलपत्र अर्पण करावे, यामुळे भगवान महादेवाची कृपा कायम राहते, असे मानतात. चला तर मग यंदाची महाशिवरात्री कधी आहे, पूजा करण्यासाठी शुभ मुहुर्त काय आहे आणि कोणत्या मंत्रांचे जप करावे याबाबत जाणून घेऊया...

महाशिवरात्री कधी आहे?

दरम्यान, दरवर्षी माघ महिन्यात कृष्ण पक्षच्या चतुर्दशी तिथीला महाशिवरात्री साजरी करतात. यंदा महाशिवरात्र 26 फेब्रुवारी रोजी आहे. पंचागांनुसार 26 फेब्रुवारीला चतुर्दशी तिथीचा शुभारंभ सकाळी 11.08 वाजता होणार असून 27 फेब्रुवारी रोजी सकाळी 8.45 वाजता तिथी संपणार आहे. या दिवशी भगवान महादेवाची पूजा, रुद्राभिषेक, उपवास करणे शुभ मानले जाते.

महाशिवरात्री निशिता काल पूजा मुहूर्त

महाशिवरात्रीच्या दिवशी निशिता काल पूजेला खास महत्व आहे. यंदा या पूजेचा मुहूर्त 27 फेब्रुवारी रोजी मध्य रात्री 12.27 वाजल्यापासून ते मध्यरात्री 1.16 वाजेपर्यंत असणार आहे.

महाशिवरात्रीच्या पूजेचा मुहूर्त

रात्री प्रथम प्रहर पूजेचा मुहूर्त सायंकाळी 6 वाजून 19 मिनिटांपासून 9 वाजून 26 मिनिटांपर्यंत.

रात्री द्वितीय प्रहर पूजेचा मुहूर्त 26 फेब्रुवारीला रात्री 9 वाजून 26 मिनिटांपासून ते 27 फेब्रुवारीला मध्यरात्री 12 वाजून 34 मिनिटांपर्यंत.

रात्री तृतीय प्रहर पूजेचा मुहूर्त 27 फेब्रुवारीला मध्यरात्री 12 वाजून 34 मिनिटांपासून ते पहाटे 3 वाजून 41 मिनिटांपर्यंत.

रात्री चतुर्थ प्रहर पूजेचा मुहूर्त 27 फेब्रुवारीला पहाटे 3 वाजून 41 मिनिटांपासून ते सकाळी 6 वाजून 48 मिनिटांपर्यंत.

महाशिवरात्रीला पूजा आणि व्रत कसे करावे?

महाशिरात्रीच्या दिवशी म्हणजेच 26 फेब्रुवारी रोजी ब्रम्ह्य मुहूर्तावर अंघोळ करुन स्वच्छ कपडे परिधान करावीत. यादिवशी संकल्प व्रत करावे.

सकाळी आणि संध्याकाळीही भगवान महादेव आणि पार्वती मातेची पूजा करावी.

पूजेच्या वेळी भगवान महादेव आणि पार्वती मातेला वस्त्र अर्पण करणे शुभ मानले जाते.

महाशिवरात्रीच्या दिवशी शिवलिंगावर बेलपत्र अर्पण करणे शुभ मानतात.

कोणत्या मंत्राचा जप करावा?

- कर्पूरगौरं करुणावतारं संसारसारं भुजगेन्द्रहारम्। सदा बसन्तं हृदयारबिन्दे भवं भवानीसहितं नमामि।।
- ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम्। उवार्रुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात्।।
- ॐ महादेवाय विद्महे रुद्रमूर्तये धीमहि तन्नः शिवः प्रचोदयात्।।
- ॐ पार्वतीपतये नमः
- ॐ नमः शिवाय



# महत्व महाशिवरात्रीचे

महाशिवरात्री कधी व का साजरी केली जाते? महाशिवरात्रीचे महत्व काय आहे? महाशिवरात्रीचे व्रत व उपासना कशी केली जाते? महाशिवरात्रीची कथा काय आहे? हि सर्व माहिती आज आपण या लेखातून जाणून घेणार आहोत. चला तर मग सुरुवात करूया. भारत देश हा संस्कृती प्रधान देश आहे. आपल्या देशात सांस्कृतिक व धार्मिक सण ठिकठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. भारतात देवदेवतांबद्दल निरतिशय प्रेम दिसण्यात येते. शिव ही वैदिक कालीन देवता आहे. वैदिक वाङ्मयात शिवाचे वर्णन आहे. दक्षिण भारतात तिसऱ्या शतकात शंगम वाङ्मयाला फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. या वाङ्मयात शंकराचे वर्णन कर्पूरगौर, सर्वश्रेष्ठ देव, कैलास पर्वतावर राहणारे, व्याघ्राजीन पांघरणारे, परशू धारण करणारे असे आहे. देवांचे ही देव, सर्वात श्रेष्ठ देव म्हणूनच की काय त्यांना महादेव असे म्हटले जाते असे वाटते.

### महाशिवरात्र कधी साजरी केली जाते?

संस्कृत पुराण साहित्यामध्ये अग्नीपुराण, शिवपुराण, पद्मपुराण या ग्रंथांमध्ये महाशिवरात्री या व्रताचे महत्त्व सांगितले आहे. माघ महिन्यातील वद्य चतुर्दशीला महाशिवरात्र असे म्हणतात. प्रत्येक महिन्यातील वद्य चतुर्दशीला शिवरात्र असते. परंतु माघ कृष्ण पक्षातील शिवरात्रीचा महिमा फार मोठा आहे.या दिवशी भगवान शंकराची उपासना केली जाते. तसेच या दिवशी सर्व हिंदू बांधव उपवास करतात.

### महाशिवरात्री का साजरी केली जाते?

काही दंतकथेनुसार समुद्रमंथनातून निघालेली रत्ने सर्वांनी घेतली. परंतु त्यातून निघालेले हलाहल भगवान शंकरांनी आपल्या कंठात साठवून ठेवले होते त्यामुळे त्यांचा कंठ निळा पडला होता. त्यामुळे त्यांना नीलकंठ असे म्हटले जाते. भगवान शंकरानी सृष्टीच्या कल्याणा साठी ते प्राशन केले आणि जगाला विनाशापासून वाचवले. अमृत पितो तो 'देव' विष पितो तो 'महादेव' असे म्हणतात. म्हणून भगवान शंकरांचे हे ऋण फेडण्याचा दिवस म्हणजेच महाशिवरात्री होय. शिवपुराणाच्या कथेनुसार महिन्याच्या कृष्णा पक्षातील चतुर्दशीला भगवान शिवलिंगाच्या रूरूपात प्रकट झाले. तेव्हा भगवान विष्णू व ब्रह्मा यांनी प्रथम शिवलिंगाची पूजा केली. तर दुसरीकडे असे म्हटले जाते की, महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शंकर व देवी पार्वती यांचा विवाह पार पडला होता. यामुळे महाशिवरात्री साजरी केली जाते.

### महाशिवरात्रीचे व्रत व उपासना :

- शंकरप्रभूची पूजा महाशिवरात्रीच्या मध्यरात्री असणाऱ्या निशिथकालात प्रदोषात सर्वात प्रभावी मानली जाते.
- शिवरात्रीच्या दिवशी रुद्राभिषेकाला फार महत्त्व आहे.
- या दिवशी उपवास करतात. हे व्रत पूर्ण एक दिवस असून दुसऱ्या दिवशी व्रताची समाप्ती होते.
- शिवपुराण, शिवस्तुती, शिवअष्टक, शिवचालीसा, शिव रुद्राष्टक, शिवाचेश्लोक, शिवपंचाक्षर आणि शास्त्र नामांमध्ये शिवाचा पाठ केला जातो.
- शिवकृपा प्राप्त होण्यासाठी 'ओम' किंवा 'ओम नमः शिवाय या मंत्रोच्चाराचे चिंतन महत्त्वपूर्ण मानले जाते.
- महाशिवरात्रीला जागरणाचे खूप महत्त्व आहे. हे व्रत इच्छा पूर्ण करणारे आहे असे मानले जाते.

### महाशिवरात्रीचे महत्त्व

सृष्टी निर्माण करणारे श्री ब्रम्हदेव, पालन करणारे श्रीविष्णु देव आणि संहार करणारे श्री महादेव हे आहेत. म्हणूनच प्रत्येकाचा शेवट किंवा मोक्ष यावर महादेवांचा अंकुश आहे असे म्हटले जाते. गेल्या जन्माचे भोग आपल्याला या जन्मात दुःख, हालअपेष्टा, संकटे, दारिद्य, शारीरिक, मानसिक त्रास या स्वरूपात भोगावे लागते. या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य महादेव करतात. भगवान शंकर म्हणजेच खरे निर्गुण, निराकार, परब्रम्ह आहेत अशा या मोक्ष कार्य महादेवाला प्रसन्न करण्याचा दिवस म्हणजे महाशिवरात्री. या दिवशी मनोभावे महादेवाची उपासना केल्यास मोक्ष प्राप्ती होते. या दिवशी केलेली उपासना ही मानवी जीवनाला सुख देते.

### १२ ज्योतिर्लिंग

भारतात शंकर प्रभुची प्रसिद्ध अशी बारा ज्योतिर्लिंग आहेत. असे म्हणतात की, जो रोज प्रभातकाळी या बारा ज्योतिर्लिंगांची नावे घेईल, त्याची सर्व पापे नष्ट होऊन त्याला सर्व सिद्धी प्राप्त होते.

- सोरटी सोमनाथ - सोरटी म्हणजे सौराष्ट्र. सौराष्ट्रातील प्रभासक्षेत्रात सोमनाथ या नावाने प्रसिद्ध आहे. याचे उपलिंगाचे नाव अनंतकेश्वर आहे. हे महीनदी जेथे सिंधू सागराला मिळते, त्या संगमावर आहे.
- श्री शैलपर्वतावर मल्लिकार्जुन नावाचे ज्योतिर्लिंग आहे. हे कृष्णा नदीच्या काठावर आहे. याचे उपलिंगाचे नाव रुद्रेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.
- ओंकारेश्वर खांडवा-इंदोर अग्निरथाच्या मार्गावर बारा किलोमीटर अंतरावर ओंकारेश्वर हे ज्योतिर्लिंग नर्मदेच्या काठावर आहे. याच्या उपलिंगाचे नाव कर्दमेश्वर आहे.
- हिमालयात केदारेश्वर हे यमुनेच्या काठी आहे. याचे उपलिंग भूतेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे.
- सिंह पर्वतावर भीमा नदीच्या काठावर, महाराष्ट्रात नाशिक हून १८० किलोमीटरवर भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग आहे. याच्या उपलिंगाला भिमेश्वर असे म्हणतात.
- काशी वाराणसी येथे गंगेच्या काठावर काशी विश्वनाथ हे महाप्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे.
- महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात गोदावरीच्या उगमा जवळ त्रंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे.
- परळी वैजनाथ नावाचे ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात मराठवाडा परळीला आहे.
- औंढा नागनाथ हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्र, मराठवाडा हिंगोलीहून २७ किलोमीटरवर आहे.
- सेतुबंध रामेश्वर हे ज्योतिर्लिंग भारताच्या दक्षिण टोकाला हिंद महासागराच्या तटावर आहे.
- घृष्णेश्वर हे ज्योतिर्लिंग महाराष्ट्र, औरंगाबाद वेरूळ येथे आहे.

### महाशिवरात्रीच्या काही कथा

महाशिवरात्रीला मोठा इतिहास आहे आणि ती पाचव्या शतकापर्यंत साजरी केली जात असल्याचा पुरावा आहे. स्कंद पुराण, लिंग पुराण आणि पद्म पुराणांसह अनेक मध्ययुगीन पुराणांचा असा दावा आहे की महाशिवरात्री ही अशीच एक घटना आहे, विशेषतः भगवान शिवाचा सन्मान करते. शैव उपासक या सुट्टीला इतके उच्च मूल्य का देतात हे यावरून स्पष्ट होते.

**१. भगवान शिवाच्या दंतकथेचा अग्निस्तंभ :** महाशिवरात्रीच्या दिवसापासून अनेक पौराणिक कथा प्रचलित आहेत. असे म्हणतात की ब्रह्मा आणि विष्णू या दोन देवांमध्ये श्रेष्ठ कोण यावर एकदा भांडण झाले. ज्यामध्ये भगवान विष्णूंनी स्वतःला संपूर्ण सृष्टीचा रक्षक म्हणून श्रेष्ठ म्हणून वर्णन केले आहे, तर ब्रह्माजींनी विश्वाचा निमार्ता म्हणून स्वतःला श्रेष्ठ असल्याचा दावा केला आहे. त्यानंतर तेथे विराट लिंग साकारले. दोन्ही देवतांनी मान्य केले की जो व्यक्ती लिंगाचा शेवट प्रथम शोधेल तो सर्वोत्तम मानला जाईल. शिवलिंगाची टोके शोधण्यासाठी ते दोघे दुसरीकडे वळले. कोणतेही प्रयोजन नसल्यामुळे विष्णू परत गेला. जरी ब्रह्माजी शिवलिंगाचा उगम झाला ते ठिकाण शोधण्यात अयशस्वी झाले, तरीही ते तेथे आले आणि त्यांनी विष्णूला सांगितले की ते निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत. ज्यात त्यांनी याचा पुरावा म्हणून केतकीच्या फुलाचाही उल्लेख केला होता. जेव्हा ब्रह्माजींनी सत्य प्रकट केले तेव्हा शिव स्वतः प्रकट झाले आणि रागाच्या भरात त्यांनी ब्रह्माजींचे एक मस्तक तोडले, केतकीच्या फुलाचा उपयोग त्यांच्या पूजेत होऊ नये म्हणून शाप दिला आणि त्यांनी असेही सांगितले की ही घटना घडेल. नेहमी फाल्गुन महिन्यात होतो. चौदाव्या दिवशी भगवान शिवाने शिवलिंगाचे रूप धारण केले. त्यामुळे आजचा दिवस महाशिवरात्री मानला जातो.

**२. हलहल विष कथा :** या प्रमाणेच भगवान शिवाने विष प्राशन केल्याची आणखी एक कथा आहे. देव आणि दानव अमृताचा शोध घेत असताना समुद्र खवळला होता. मग महासागरातून अनेक गोष्टी बाहेर आल्या. त्यापैकी एक हलाहल विष होते, जे इतके शक्तिशाली आणि प्राणघातक होते की सर्व देवता आणि असुरांनी त्यांना त्या भांड्याजवळ जाण्यास मनाई केली होती. सर्व देवतांनी भगवान शिवाच्या गर्भगृहात प्रवास केला आणि संपूर्ण ग्रहाच्या संरक्षणासाठी प्रार्थना केली. विषारी विषापासून जेव्हा या समस्येने संपूर्ण जगात दहशत निर्माण केली आणि सर्व सजीवांना धोका होता. हे भयंकर विष नंतर भगवान शंकरांनी ग्रासले होते, त्यांनी ते गिळले. त्यामुळे त्याचा कंठ निळा झाला आणि त्याला नीलकंठ हे नाव पडले. तेव्हापासून महाशिवरात्री एकाच दिवशी साजरी केली जाते.

**३. शिव-पार्वती जयंतीशी संबंधित कथा :** महाशिवरात्रीच्या सभोवतालची तिसरी सर्वात प्रसिद्ध आख्यायिका दावा करते की भगवान शिव देखील त्यांच्या पहिल्या वधू सतीच्या निधनानंतर अत्यंत दुःखाचा अनुभव घेतात. त्यानंतर सतीला माता पार्वती म्हणून नवीन जन्म मिळेल. परिणामी भगवान शिव त्याच्याकडे थोडे लक्ष देतात. त्यानंतर, ती भगवान शिवची तपश्चर्या संपवण्यासाठी कामदेवाची मदत घेते, परंतु कामदेवाचाही या प्रक्रियेत नाश होतो. जसजसा वेळ जातो तसतसे भगवान शिव माता पार्वतीची पूजा करण्यासाठी वाढतात आणि तिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतात. या विवाहासाठी फाल्गुन महिन्यातील अमावास्येचा दिवस निश्चित करण्यात आला आहे. म्हणूनच हा दिवस महाशिवरात्री उत्सवाला समर्पित आहे.

### महाशिवरात्री – जागरणाची रात्र

महाशिवरात्री ही प्रत्येक व्यक्तीच्या आत असलेल्या आणि सर्व सृष्टीची उत्पत्ती असलेल्या अमर्याद शून्यतेच्या जाणीवेशी जोडण्याची संधी आहे. शिवाला कधीकधी संहारक म्हणून संबोधले जाते, परंतु ते सर्वात काळजी घेणारे देखील आहे. अपार करुणेच्या वेषात ते योगसागांमध्ये असंख्य रूपे दाखवतात. त्यांच्या दयाळूपणाने आश्चर्यकारक आणि असामान्य रूप धारण केले आहे. परिणामी, महाशिवरात्री २०२५ रोजी अनेक ग्रहणांची एक अनोखी रात्र असेल. आम्ही आशा करतो आणि प्रार्थना करतो की आज संध्याकाळी आम्ही ज्या अमर्याद विस्ताराचा उल्लेख करतो ते तुम्हाला कमीत कमी थोडक्यात जाणवेल. ही तुमच्यासाठी जागरणाची रात्र असावी, चैतन्य आणि जागरुकतेने भरलेली, केवळ जागरणाची थकलेली रात्र नसावी.

**शिव रुद्राभिषेक :** संपूर्ण श्रावण महिना शिव रुद्राभिषेकासाठी विशेष महत्त्वाचा आहे. शिवाला विविध द्रव्यांनी स्नान घालण्याची प्रथा शिव रुद्राभिषेक म्हणून ओळखली जाते. शिवाच्या उच्चाराच्या व्यतिरिक्त अभिषेक पद्धतीचे आयोजन करण्याची शिफारस केली जाते कारण यजुर्वेदातील शिव रुद्राभिषेकाचे वर्णन संपूर्णपणे अनुसरण करणे कठीण आहे.

### या महाशिवरात्रीला काय करू नये

- महा शिवरात्री म्हणजे आनंदाचा, उत्सवाचा दिवस. महाशिवरात्रीच्या वेळी फक्त ध्यान करा, भगवान शिवाची पूजा करा आणि इतर आध्यात्मिक साधना करा.
- जर तुम्ही कठोर व्रत पाळत असाल तर शिवरात्रीला झोपू नका.
- भगवान शिवाच्या पवित्र महिमाचे चिंतन करताना रात्रभर मंत्र गाणे आणि जपत राहा.
- मनोरंजक क्रियाकलापांपासून दूर राहा, निरर्थक वाद आणि खोटे बोलणे टाळा आणि या कालावधीत केवळ देवाचे ध्यान करण्यासाठी आणि त्याची उपासना करण्यासाठी वेळ बाजूला ठेवा.
- फक्त शाकाहारी जेवण खा. कोणत्याही परिस्थितीत दारू आणि इतर मादक पदार्थ टाळा.

### महा शिवरात्रीच्या १० ओळी

- भगवान शिवाच्या प्रमुख सणाला महाशिवरात्री म्हणतात.
- ही हिंदूंची प्राथमिक सुट्टी आहे.
- दरवर्षी फाल्गुन कृष्ण चतुर्दशीला महाशिवरात्री साजरी केली जाते.
- महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिव आणि माता पार्वतीचा विवाह झाला.
- या दिवशी सृष्टीची सुरुवात झाली असे पुराण सांगतात.
- या दिवशी बहुसंख्य लोक पूर्ण दिवस उपवास करतात.
- या दिवशी प्रत्येक मंदिरात शिवाला अभिषेक केला जातो.
- भगवान शिवाला पंचामृत, बेलपत्र, भांग, धतुरा आणि बेर ही फळे दिली जातात.
- या दिवशी मंदिरात भजन कीर्तन केले जाते.
- या दिवशी, जो कोणी उपवास करतो त्याच्या सर्व मागण्या मान्य केल्या जातात.

# महाशिवरात्री उपवास! विक्रती फराळ आणि धोका, अशी घ्या काळजी...

हिंदू पंचांगानुसार यंदा महाशिवरात्री २६ फेब्रुवारीला साजरी केल्या जाणार आहे. फाल्गुन महिन्याच्या कृष्णपक्षातील चतुर्दशीस महाशिवरात्री साजरी केल्या जाते. या दिवशी शिव व पार्वती यांचा विवाह पार पडला, अशी पौराणिक मान्यता आहे. कडकडीत उपवास पण फराळ दिमतीस असतोच. काही केवळ दुधावर तर बरेच विविध फराळी खाद्यवार दिवस काढतात. आता तर बाजारात या दिवशी विविध फराळी खाद्यची रेलचेल दिसून येते. म्हणून अन्न व औषधी प्रशासनाने खबरदारी घेण्याचा इशारा दिला आहे.

उपवास करणारे मोठ्या भगर, साबुदाणा, शिंगाडा व राजगिरा पीठ तसेच अन्य पदार्थांचा वापर करतात. मात्र या पदार्थांचे सेवन केल्याने विषबाधा झाल्याच्या घटना उजेडात आल्या आहेत, असे अन्न व औषधी विभागाचे सहाय्यक आयुक्त प्र. भा. टोपले यांनी निदर्शनास आणले आहे. म्हणून खबरदारी घेणे आवश्यक आहे. बाजारातून पदार्थ आणल्यावर ते स्वच्छ करावे. शक्यतो पाकीटबंद पदार्थ घ्यावे. पॅकिंग व अंतिम वापर दिनांक तपासावा. हे अन्नपदार्थ झाकणबंद डब्यात व कोरड्या ठिकाणी ठेवावे. ओलावा असल्यास बुरशी लागणार. ज्यास्त दिवस साठवू नये.फराळासाठी उघड्यावरचे पदार्थ विकत घेणे टाळावे. भगरीची भाकर करण्याऐवजी खिचडी खावी. भगर व शेंगदाणे यात अधिक प्रथीने असतात. सलग उपवास असतांना या पदार्थांचे सेवन ॲसिडिटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे विकार होवू शकतात. म्हणून पचन क्षमतेनुसार भगर व शेंगदाणे खावेत. शिळ्या अन्न पदार्थांचे सेवन करू नये.

या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थ विकणाऱ्यांना पण सूचना करण्यात आल्या आहेत. विक्रेत्यांनी पॅकबंद पदार्थांचीच विक्री करावी. पदार्थ विकत घेतांना उत्पादक किंवा विक्रेत्याकडून बिले घ्यावीत. पदाथार्चे पॅकेट तसेच पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना, पॅकिंग व अंतिम वापर दिनांक याची खात्री करावी. विक्रेत्यांनी मुदतबाह्य पदार्थांची विक्री करू नये. तयार अन्न पदार्थ उघड्यावर ठेवू नये व ते तयार करतांना आरोग्य तसेच स्वच्छतेचे निकष पाळावे, अशी सूचना हॉटेल मालकांना करण्यात आली असल्याचे आयुक्त टोपले यांनी नमूद केले.

अध्यात्म व व्रतवैकल्याचे जाणकार पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री हे म्हणतात की फराळबाबतीत खबरदारी आवश्यक आहे. या दिवशी अनेक ठिकाणी फराळ वाटप केल्या जाते. सार्वजनिक ठिकाणी होणारे असे वितरण दक्षता घेऊन झाले पाहिजे. अधिकाऱ्यांनी तपासणी करावी. खरं तर हा फराळ नव्हे तर शिवजीला अर्पण केल्या जाणारा प्रसाद असतो. घरच्या गृहिणीने पवित्र मनाने व स्वच्छतेची काळजी घेऊन तयार केलेला प्रसाद पावतो. प्रसाद फराळ ही आराधना समजावी. मिताहार करावा.

## सावध राहा

अनोळखी क्रमांकावरून महावितरणचे वीज देयक भरणा करा, असा लघुसंदेश आपल्या मोबाईल, व्हॉट्सपवर आल्यास त्यापासून सावध राहण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. तुम्ही वीज देयक भरणा केलेले नाही. तुमच्या घराचा वीज पुरवठा तात्काळ खंडित केला जाणार आहे, अशी माहिती देऊन काही सायबर भुरटे वीज ग्राहकांची फसवणूक करतात. वीज ग्राहकांना तात्काळ वीज देयक भरणा करण्यास सांगून, त्यांची बँक खाते व इतर माहिती ताब्यात घेऊन त्या माध्यमातून सायबर आर्थिक घोटाळा करतात. महावितरण थकबाकीदार वीज ग्राहकाला पूर्वसूचना देऊन, त्याला रितसर नोटीस देऊन मगच वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करते. त्यामुळे कोणी कितीही वीज देयक भरणा करा, आपल्या घराचा वीज पुरवठा खंडित केला जाणार आहे, असे संपर्क करून सांगितले तरी त्याच्यावर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## महावितरणच्या कल्याण परिमंडळात ३३ लाख वीज ग्राहकांकडून ७३६ कोटीचा वीज देयक भरणा

**■कल्याण :** महावितरणच्या कल्याण परिमंडळात गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत ३३ लाख सामान्य, लघुदाब वीज ग्राहकांनी एकूण ७३६ कोटी ५२ लाख रूपयांचा वीज देयक भरणा महावितरणकडे केला आहे. हा सर्व वीज भरणा वीज ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने भरणा केला आहे. वीज ग्राहकांना वीज देयक भरण्यासाठी उपयोजन, नेटबँकिंग, आरटीजीएस अशी अनेक ऑनलाईन साधने महावितरणने उपलब्ध करून दिली आहेत. या साधनांच्या साहाय्याने ग्राहकांनी हा वीज भरणा केला आहे, असे महावितरणच्या अधिकाऱ्याने सांगितले. कल्याण परिमंडळात जानेवारीमध्ये २० लाख ९८८ लघुदाब वीज ग्राहकांनी



४५६ कोटी २२ लाख रुपयांची वीज देयके ऑनलाईन माध्यमातून भरणा केली. २० फेब्रुवारीपर्यंत १३ लाख २२ हजार ६०६ ग्राहकांनी २८० कोटी ३० लाख रूपयांचा वीज देयक भरणा ऑनलाईन माध्यमातून भरला आहे. वीज ग्राहक महावितरणच्या डिजिटल पध्दतीचा वीज देयक भरणा करण्यासाठी वापर करत असल्याने वीज ग्राहकांचे वीज देयक भरणा केंद्रासमोर उभे राहण्याचे कष्ट वाचले आहेत. ऑनलाईन देयक भरणा केल्याने वीज ग्राहकांना वीज देयकात पाव टक्का सवलतही मिळत आहे. जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा अधिक वीज देयके ऑनलाईन माध्यमातून भरणाऱ्या ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी सोडत पध्दतीने स्मार्टफोन, स्मार्टवॉच अशी आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी महावितरणच्या उपविभाग स्तरावर वीज ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यात प्रत्येक महिन्यात एकदा सोडत काढली जाणार आहे. प्रत्येक सोडतीमध्ये पाच विजेत्यांना स्मार्टफोन, स्मार्टवॉच जिंकण्याची संधी विजेत्यांना प्राप्त होणार आहे.

## कल्याण पूर्वेत वसार येथे बेकायदा चाळी उभारणाऱ्या चार जणांवर फौजदारी गुन्हे

**■कल्याण :** कल्याण पूर्वेतील वसार गाव हद्दीतील डावलपाडा येथील पुंडलिक म्हात्रे शाळेच्या पाठीमागे बेकायदा चाळी उभारणाऱ्या चार बांधकामधारकांच्या विरुध्द कल्याण डोंबिवली पालिकेच्या आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी वरिष्ठांच्या आदेशावरून हिललाईन पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल केले.



"कल्याण पूर्वेतील आय प्रभागातील वसार डावलपाडा भागात चार जणांनी बेकायदा चाळी उभारल्याच्या तक्रारी होत्या. या चाळींच्या बांधकाम परवानगीची कागदपत्रे बांधकामधारक आय प्रभागात सादर करू शकले नाहीत. ही बांधकामे त्यांनी स्वताहून काढून टाकली नाहीत. ही बांधकामे अनधिकृत घोषित करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले. पोलीस बंदोबस्तात ही सर्व बेकायदा बांधकामे लवकरच जमीनदोस्त केली जातील."

**-भारत पवार, साहाय्यक आयुक्त,आय प्रभाग.**

मागील आठवड्यात साहाय्यक आयुक्त पवार यांनी माणेरे परिसरातील जीन्सचे प्रदुषणकारी बारा बेकायदा कारखाने जमीनदोस्त केले होते. वसार डावलपाडा येथील रहिवासी बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनील राणे, सचिन म्हात्रे अशी गुन्हा दाखल बांधकामधारकांची नावे आहेत. आय प्रभागाचे अधीक्षक शंकर जाधव यांनी साहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या आदेशावरून हे गुन्हे दाखल केले. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाने हे गुन्हे दाखल करण्यात आले.

कल्याण पूर्वेतील वसार डावलपाडा भागातील पुंडलिक म्हात्रे शाळेच्या पाठीमागे बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनील राणे, सचिन म्हात्रे यांनी बेकायदा चाळींची बांधकामे पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता केली असल्याची माहिती आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त पवार यांना मिळाली होती. या माहितीप्रमाणे साहाय्यक आयुक्त पवार यांनी या बेकायदा चाळींची खात्री करण्यासाठी अधीक्षक जाधव, नितीन चौधरी, महेश धिंग्रे, सखाराम निरगुडा, नरेश बोंबे यांच्यासह पाहणी केली. त्यावेळी तेथे मोकळ्या जागांमध्ये चाळींची बेकायदा बांधकामे आढळून आली.

या बेकायदा चाळींची खात्री पटल्यावर साहाय्यक आयुक्त पवार यांनी चाळीची बांधकामे करणाऱ्या फुलोरे, राणे, म्हात्रे यांना नोटिसा पाठवून बांधकाम परवानगी, जमिनीचा मालकी हक्काबाबत कागदपत्रे सादर करण्याचे कळविले होते. दिलेल्या सुनावणीच्यावेळी बांधकामधारक बेकायदा चाळीच्या बांधकामांची कागदपत्रे आय प्रभागात सादर करू शकले नाहीत. त्यामुळे ही बांधकामे अनधिकृत घोषित करून त्यांना आय प्रभागाने बांधकामे स्वताहून काढून टाकण्याच नोटीस बजावली होती. त्या विहित मुदतीत बांधकामधारकांनी बेकायदा चाळींची बांधकामे काढून टाकली नाहीत.

त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशावरून साहाय्यक आयुक्त पवार, अधीक्षक जाधव यांनी बाळकृष्ण फुलोरे, मंगेश फुलोरे, सुनील राणे आणि सचिन म्हात्रे यांच्या विरुध्द हिललाईन पोलीस ठाण्यात शुक्रवारी एमआरटीपीचा गुन्हा दाखल केला. या बेकायदा चाळींमधील खोल्या सुमारे पाच ते सहा लाख रूपयांना विकल्या जातात.

## 'कल्याण-तळोजा मेट्रो १२'चे ७ टक्के काम पूर्ण

**■कल्याण :** 'कल्याण-डोंबिवली-तळोजा मेट्रो १२' मार्गिकेच्या उभारणीचे काम हाती घेतले आहे. या मार्गिकेच्या कामाला मार्च २०२४ मध्ये सुरुवात झाली असून ११ महिन्यांच्या कालावधीत 'मेट्रो १२' मार्गिकेचे ७ टक्के काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. त्यानुसार आता कामाला वेग देण्यात आला असून लवकरच या मार्गिकेतील निळजे कारशेडच्या कामालाही सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. यासाठी येत्या काही दिवसातच कारशेडच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. एमएमआरडीएच्या ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पातील 'कल्याण-तळोजा मेट्रो १२' मार्गिका एक महत्त्वाची मार्गिका आहे.

ही मार्गिका ठाणे आणि नवी मुंबई अशा दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणार आहे. 'ठाण-भिवंडी-कल्याण मेट्रो ५' मार्गिकेचा विस्तार 'मेट्रो १२' मार्गिकेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. २०.७५ किमी लांबीची





आणि १९ मेट्रो स्थानकांचा समावेश असलेली ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास कल्याण-डोंबिवली-नवी मुंबई अंतर अवघ्या काही मिनिटांत पार करण्यात येणार आहे. 'मेट्रो १२' मार्गिकेच्या कामाला मार्च २०२४ मध्ये सुरुवात करण्यात आली असून गेल्या ११ महिन्यांच्या कालावधीत या मार्गिकेचे केवळ ७ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरडीएतील सूत्रांनी दिली.

आता एमएमआरडीएने 'मेट्रो १२'च्या कामाला गती दिली आहे. त्यामुळे या मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण होईल, असा विश्वासही सूत्रांनी व्यक्त केला. मेट्रो १२ मार्गिकेचे काम डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करून ती वाहतूक सेवेत दाखल केली जाणार आहे. त्यामुळे ठाणे-कल्याण-डोंबिवली-नवी मुंबई असा मेट्रो प्रवास करण्यासाठी ठाणेकर आणि नवी मुंबईकरांना जानेवारी-फेब्रुवारी २०२८ पर्यंत वाट पाहावी लागणार आहे. दरम्यान, 'मेट्रो १२' मार्गिकेच्या कामाला वेग देतानाच दुसरीकडे या मार्गिकेच्या निळजे कारशेडच्या कामालाही लवकरात लवकर सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

'मेट्रो १२'साठी निळजे-निळजेपाडा येथील ४५ हेक्टर जागेवर कारशेड बांधण्यात येणार आहे. या जागेचा ताबा एमएमआरडीएने घेतला आहे. आता प्रत्यक्ष कारशेडच्या कामाला सुरुवात करण्याच्यादृष्टीने निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम सुरू आहे. येत्या काही दिवसांतच कारशेडच्या कामासाठी निविदा मागविण्यात येतील आणि त्यानंतर कारशेडच्या कामाला सुरुवात होईल, असेही सूत्रांनी सांगितले.

## कल्याण-डोंबिवलीचा पाणी पुरवठा गुरूवारी बारा तास बंद



**■कल्याण :** उदंचन केंद्र देखभाल, दुरुस्ती आणि व्हॉल्व्ह बदलण्याची, जलवाहिन्या दुरुस्ती आणि देखभालीची कामे करण्यासाठी कल्याण, डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा येत्या गुरूवारी (ता. २७) सकाळी १० ते रात्री १० या वेळेत कल्याण डोंबिवली पालिकेतर्फे बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत कल्याण पूर्व, पश्चिम, डोंबिवली पूर्व, पश्चिम भागाचा पाणी पुरवठा पूर्णता बंद राहणार आहे, अशी माहिती पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली.

## भिवंडीत २२ वर्षीय तरुणीवर आळीपाळीने सामूहिक अत्याचार

**■भिवंडी :** भिवंडी शहरात एका २२ वर्षीय तरुणीवर झालेल्या धक्कादायक सामूहिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी जलद कारवाई करत ४८ तासांच्या आत सहा आरोपींना अटक केली आहे. ही घटना बागे फिरदोस परिसरात घडली. जिथे पीडित तरुणीला तिच्या भावासह जबरदस्तीने पळवून नेण्यात आले. आरोपींनी पीडितेच्या भावास आणि रिक्षा चालकास मारहाण करून तिला नागाव परिसरातील निर्जनस्थळी नेले आणि तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केले. त्यानंतर आरोपींनी तिला फातिमा नगर भागातील एका पिकअप बोलेरो गाडीत नेऊन पुन्हा अत्याचार केले. याप्रकरणी प्रथम तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नंतर तो शांतीनगर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला.

**शहरात संतापाची लाट, महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर नागरिकांमध्ये चिंता**

दरम्यान, पोलिसांनी तातडीने तपास हाती घेत ४८ तासांच्या आत पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर या घटनेचा अधिक तपास शांतीनगर पोलीस करत असून आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने आरोपींना २७ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाने शहरात संतापाची लाट उसळली असून महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

### अल्पवयीन मुलीवर घरात घुसून लैंगिक अत्याचार, आरोपी मोकाट

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील शेलापुर या गावात एका अल्पवयीन मुलीवर घरात घुसून लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा प्रकार उजेडात आला आहे. मात्र या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन चार दिवस उलटले असताना अद्याप आरोपी मोकाटच असल्याचे पुढे आले आहे. दरम्यान आरोपीला अटक न केल्याने गावातील शेकडो महिलांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात धडक दिली. लैंगिक अत्याचार करणारा आरोपी अद्याप मोकाट असून या आरोपीचे नातेवाईक हे पीडीतेला व तिच्या पालकांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत असल्याचे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी पोलीस अधीक्षकांना आंदोलकांची मागणी लक्ष्यात घेत अधिक जलद गतीने तपास करण्याचे आश्वासन दिलं आहे. मात्र यावेळी आक्रमक महिलांनी बुलढाणा पोलिसांचा ही निषेध नोंदवला व आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.



## 'सोशल मीडिया'वर ओळख, प्रेम आणि विवाह; त्यानंतर मात्र...

**■अकोला :** समाज माध्यमावर तरुण-तरुणीची ओळख झाली. या ओळखीतून भेटी-गाठी त्यातून प्रेम निर्माण झाले. कुटुंबीयांचा विरोध असतानाही दोघांनी प्रेम विवाह केला. मात्र, पुढे नको तेच घडले. काही महिने सुरळीत गेल्यानंतर पती व सासरच्यांकडून विवाहितेचा दुचाकी आणि पैशांसाठी शारीरिक, मानसिक छळ सुरू झाला. सहनशक्तीचा अंत झाल्याने विवाहितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी पतीसह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

समाज माध्यमे तरुणाईच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तरुणाई समाज माध्यमावर सक्रिय असते. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप, युट्युब अशा माध्यमांचा वापर करण्यात आजची तरुण पिढी अग्रेसर आहे.

या आभासी जगातून मैत्रीचे नाते जोडल्या जाते. तरुण व तरुणीमधील आकर्षणातून प्रेम संबंध सुरू होण्याचे प्रकार अनेक वेळा घडतात. कुटुंब व समाज यांचा विरोध पत्करून जोडपे विवाह बंधनात देखील अडकतात. मात्र, हे नाते फार काळ टिकत नाही. टोकाची भूमिका घेतली जाते. असाच एक प्रकार अकोला जिल्ह्यात समोर आला आहे. समाज माध्यमातील ओळखीतून प्रेम व त्यानंतर जोडप्याने विवाह केला. मात्र, काही दिवसांतच विवाहितेचा छळ सुरू झाला. प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले.

गीता पवन आठवले (वय २३, ह.मु, जवळा बु., ता.जि. अकोला) यांनी बोरगांवमंजू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांचे पती पवन वसंता आठवले (रा. पिंप्री, ता. कारंजा, जि. वाशीम) यांच्यासोबत समाजमाध्यमातील ओळखीनंतर त्यांनी १० सप्टेंबर २०२२ रोजी अकोला येथे विवाह केला.

पतीच्या कुटुंबीयांनी हा विवाह मान्य केला नाही. लग्नानंतर काही दिवसांनीच पती व सासरच्या मंडळींनी दोन लाख रुपये व एक बुलेट गाडीच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ सुरू केला. सासू पद्मा आठवले यांनी जबरदस्ती घरकाम करून घेतले आणि अन्नातून विषबाधा करून गर्भपात घडवून आणल्याचा आरोप फियार्दीने केला आहे. अमरावती येथे बोलावून शिवीगाळ व मारहाण केल्याचेही फियार्दीत नमूद केले. सासरच्यांनी तडजोडीस नकार दिल्याने अखेर विवाहितेने बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पती पवन आठवले, सासू पद्मा आठवले, सासरचे रोहन आठवले, पवनचा चुलत जावई धम्मदीप तायडे आणि दीक्षा तायडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दिवसाढवळ्या ज्येष्ठ नागरिकाला भुरट्याने लुटले

**■डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील सुभाष रस्त्यावर गुरुवारी सकाळी अकरा वाजण्याच्या दरम्यान एका ७५ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकाला एका ३५ वर्षाच्या भुरट्या चोराने लुटले. या ज्येष्ठ नागरिकाला तुमच्या सदऱ्याच्या मागील भागात मानेवर किडे पडले आहेत, असे सांगून त्यांच्या हातामधील पैसे असलेली पिशवी बाजुला ठेवण्यास सांगितले. ज्येष्ठ नागरिक सदरा काढण्यात मग्न असताना भुरट्या चोराने ज्येष्ठ नागरिकाने बाजुला ठेवलेली पैशाची पिशवी घेऊन पळ काढला.

पांडुरंग बाळाजी सुर्वे (७५) असे लूट झालेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. ते डोंबिवली पूर्वेतील देसलेपाडा भागात राहतात. लुटीचा प्रकार डोंबिवली पश्चिमेतील सुभाष रस्त्यावरील श्री स्वामी समर्थ पोळीभाजी केंद्रासमोर घडला. यासंदर्भात पांडुरंग सुर्वे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. डोंबिवलीत दिवसाढवळ्या नागरिकांना लुटण्याचे प्रकार सुरू झाल्याने नागरिकांमध्ये





अस्वस्थता आहे.

तक्रारदार सुर्वे यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की डोंबिवली पश्चिमेतील एका बँकेमधून तीस हजार रुपए काढले. ते पैसे आपण जवळील पिशवीत सुरक्षितपणे ठेवले. पिशवीत बँकेचे पासबुक होते. बँकेची कामे झाल्यानंतर घरातील किराणा भरण्याच्या कामासाठी आपण एका किराणा दुकानादाराकडे सुभाष रस्ता भागात पायी जात होतो. त्यावेळी सुभाष रस्त्यावर स्वामी समर्थ पोळी भाजी केंद्रासमोर आल्यावर आपल्याला एका ३५ वर्षाच्या इसमाने हाक मारून थांबविले.

त्यानंतर तो इसम जवळ आला. त्याने तुमच्या मानेवर मागील बाजुस बारीक किडे पडले आहेत. त्या किड्यांचा तुम्हाला त्रास होईल. सदरा खराब होईल, अशी भीती इसमाने ज्येष्ठ नागरिकाला घातली. तुम्ही सदरा काढा. आपण सदरा पाण्याने धुऊन काढू. इसमाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन तक्रारदाराने सदरा काढण्यासाठी हातामधील पिशवी बाजुच्या एका खुर्चीवर ठेवण्यास सांगितली. तक्रादार सुर्वे सदरा काढण्यात मग्न असताना भुरट्याने तेवढ्या संधीचा गैरफायदा घेऊन, सुर्वे यांना बोलण्यात गुंतवून भुरट्याने खुर्चीवर ठेवलेली पैशांची पिशवी घेऊन पळ काढला.

सदरा काढल्यावर इसम पिशवी घेऊन कोठे गेला म्हणून तक्रारदाराने आजुबाजुला पाहिले तोपर्यंत भुरटा चोर पळून गेला होता. आपल्या मानेवर किडे पडले आहेत, असे आपणास खोटे सांगून आपली फसवणूक आणि लूट भुरट्याने केली म्हणून पांडुरंग सुर्वे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेल्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून पोलीस निरीक्षक गहिनीनाथ [illegible] यांप्रकरणाचा तपास करत आहेत.

## ३ वेगवेगळ्या नावाने वास्तव्य करणारा बांगलादेशी अटकेत

**■पिंपरी :** तीन वेगवेगळ्या नावाने बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी व्यक्तीला भोसरी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास बनाचा ओढा, भोसरी येथे करण्यात आली.

अटक केलेल्या आरोपीकडे नयन रतन सरकार (वय २१, रा. क्रिष्णापूर, लोहागारा, जि. नराईल, बांगलादेश), राकेश रतन सरकार (रा. घोला नादिया, पश्चिम बंगाल), सुमित शंकर भक्ता (रा. नाकाशी पारा, पश्चिम बंगाल) अशा तीन नावाची कागदपत्रे आढळून आली. त्याचे मूळ नाव नयन सरकार असे आहे. तो सध्या दिघीतील कामगार वसाहतीत वास्तव्य करत होता. त्याने बांगलादेश मधून पश्चिम बंगाल मध्ये अनधिकृतपणे घुसखोरी करून प्रवेश केला. त्यानंतर तो कामाच्या निमित्ताने भोसरीत आला होता.





भोसरी पोलिसांकडून दररोज रात्री सहा ते नऊ या कालावधीत नाकाबंदी लावली जाते. रविवारी नाकाबंदी सुरु असताना नयन संशयितपणे जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याच्या बोलण्यात तफावत आढळून आली. त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये वेगवेगळ्या नावाची कागदपत्रे आढळून आली. तो बांगलादेशी असल्याचे निदर्शनास आले. पश्चिम बंगाल येथील भारतीय मतदान ओळखपत्र, बांगलादेश येथील लोहागारा, जि. नराईल येथील लक्ष्मीपाशा आदर्श सेकंडरी स्कुल या शाळेचा दाखला आढळून आला. पोलिसांनी नयन याला अटक केली. परकीय नागरिक आदेश, परकीय नागरिक कायदा यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो मागील एक वर्षापासून पिंपरी-चिंचवड शहरात बेकायदेशीर वास्तव्य करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. उपहारगृह आणि बांधकाम प्रकल्पावर काम करत होता. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गुरव तपास करीत आहेत.

## कल्याणमध्ये स्कायवॉकवर भाजी विक्रेत्यावर दगडाने हल्ला करणाऱ्या २ जणांना अटक

**■कल्याण :** कल्याण पूर्व सिध्दार्थनगरमध्ये रेल्वे स्थानकाजवळील स्कायवॉक परिसरात गुरुवारी पहाटे तीन वाजता दोन जणांनी एका भाजी विक्रेत्याबरोबर भांडण करून त्याच्यावर दगडाने हल्ला केला. त्यांच्या जवळील भाजी खरेदीसाठीची सहा हजार रूपयांची रोख रक्कम आणि मोबाईल लुटून नेला होता. याप्रकरणी भाजी विक्रेत्याने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे.





करण संदेश समुद्रे (२२), दीपेश रमेश पांचाळ (२७) अशी अटक करण्यात आलेल्या मारेकऱ्यांची नावे आहेत. ते कल्याण पूर्वेतील सिध्दार्थनगर, हनुमाननगर कोळसेवाडी भागात राहतात.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की गुरुवारी पहाटे तीन वाजताच्या दरम्यान भाजी विक्रेता सुरेश बहादूर (२०) हे कल्याण पूर्व भागातून कल्याण पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील लक्ष्मी घाऊक भाजी बाजारात भाजी खरेदीसाठी पायी चालले होते. ते कल्याण पूर्व भागात कुटुंबीयांसह राहतात. कल्याण पूर्व रेल्वे स्थानकाजवळील सिध्दार्थनगर भागातून रेल्वे स्कायवॉकच्या दिशेने जात असताना सुरेश यांना यांना दोन जणांनी हाक मारून थांबविले.

दोघांनी अचानक सुरेश यांच्याशी वाद घालून त्यांच्यावर दगडाने हल्ला चढविला. अचानक घडलेल्या याप्रकाराने भाजी विक्रेता सुरेश बहादूर घाबरले. पहाटेची वेळ असल्याने तेथे इतर पादचारी नव्हते. दोघांनी सुरेश यांच्यावर हल्ला करत असताना त्यांना पकडून त्यांच्या जवळील भाजी खरेदीसाठी जवळ असलेली सहा हजार रूपयांची रोख रक्कम आणि त्यांचा मोबाईल हिसकावून दोघेही पळून गेले. दगडाचे घाव वर्मी बसल्याने भाजी विक्रेता सुरेश जखमी झाले होते. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले.

भाजी विक्रेत्याने याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार केली. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांनी तातडीने याप्रकरणाचा तपास करण्याचे आदेश पोलिसांना दिले. सिध्दार्थनगर रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही चित्रण पोलिसांनी तपासले. त्यामध्ये दोन जण सुरेश यांना लुटत असल्याचे दिसून आले. सीसीटीव्ही चित्रणातील दोघांची ओळख पोलिसांनी पटवली. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी करण समुद्रे, दीपेश पांचाळ यांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील लुटलेली सहा हजार रूपयांची रोख रक्कम व मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. या दोघांनी असे काही गुन्हे यापूर्वी केले आहेत का या दिशेने पोलीस तपास करत आहेत.

साहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप भालेराव, दर्शन पाटील, हवालदार राजेश कापडी, मिलिंद बोरसे, भागवत सौंदाणे, विलास जरग, सचिन कदम, वाघ, दिलीप सोनावळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com